क्रमांक : मुंमप्रविप्रा/ बैठक/५४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व १५,
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १३-३-१९९१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २२ फेब्रुवारी, १९९१ रोजी झालेल्या ५४ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य

निमंत्रित :

शासनाचे सचिव [२]
नगर विकास विभाग
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :
प्राधिकरणाचे अधिकारी

. . . . . .

No.BMRDA/MTG/54.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos.C-14 & C-15,
Bandra-Kurla Complex,
'E' Block, Bandra(East),
Bombay-400 051.

Date : 13th March, 1991.

The minutes of the 54th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 22nd February, 1991 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

Sd/- 13/3/91
(S. V. VASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

INVITEE

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :

Officers of B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-.-.-.-.-

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## ५४व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २२ फेब्रुवारी, १९९१ [शुक्रवार]

वेळ : सकाळी ११-०० वाजता

सभास्थान : सहावा मजला, बीएमआरडीए इमारत, वांद्रे.

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री. सुशीलकुमार सं. शिंदे<br>नगर विकास मंत्री | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान,<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री. अरुणलाल गो. गुजराथी,<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. र. छो. अंकलेश्वरीया,<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्रीमती इंदूमती त्रि. पटेल,<br>नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्या |
| श्री. बालकुमार अग्रवाल,<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री. आर. एल. परदीप,<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [५३व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील बैठकीतील [५३वी] कार्यवृत्तावरील कार्यवाही

कार्यवृत्तावरील कार्यवाहीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र. ३ : कामराज नगर, धारावी जवळील वांद्रे-कुर्ला समूहाच्या, "एच" ब्लॉकमधील भूखंडाचा निवासी भाग निकालात काढणे

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४४१ :

"असा ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३, उपकलम [२] खाली प्रदान केलेल्या शक्तींचा आणि

[कृ. मा. प.]

या संबंधातील अन्य शक्तींचा वापर करून, चटई क्षेत्र निर्देशांक १.५ सहीत १२४२७ चौ.मीटरचा भूखंड पंतप्रधान अनुदान प्रकल्पाखाली, धारावी पुनर्विकास कामासाठी प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु. ३००० दराने संगणित केलेल्या जमिनीच्या मूल्याच्या ८ टक्के दराने वार्षिक भाडेपट्टयाने, करारपत्र केल्यापासून ३० वर्षाच्या कालावधीकरिता, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला देण्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येतो की, या ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात पुढील योग्य कार्यवाही करण्याचे आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला क्षतिपूर्ति करार देण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत.

"असाही ठराव करण्यात येतो की, जमिन निकालात काढण्याबाबत कागदपत्र करताना भाडेपट्टयाच्या करारात आणि भाडेपट्टयाच्या विलेखात योग्य बदल करण्याचे अधिकार, महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

बाब क्र.४ : कोकरी आगार येथील सुमारे ०.७२ हेक्टर भूखंडाचे रुग्णालय बांधण्याकरिता मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरण.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.४४२ :

"असा ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३, उपकलम [२] खालील शक्तींचा वापर करून, प्रस्तावित केल्याप्रमाणे रुग्णालय बांधण्याकरिता ०.७२ हे. जमीन किंवा वडाळा-अनिकचे मोजमाप झाल्यानंतर निश्चित करण्यात येणारे प्रत्यक्ष क्षेत्र, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भाडेपट्टयाने देण्याच्या प्रस्तावाला प्राधिकरण मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येतो की, ही जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याच्या संबंधात आणि जमीन देण्याबाबतचा विनिमय दर दर्शविण्याच्या संबंधात आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत.

"असाही ठराव करण्यात येतो की, जमिनीचे बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरण करण्याच्या संबंधातील भाडेपट्टयाच्या करारात आणि भाडेपट्टी-विलेखात आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

बाब क्र.५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा
१९८९-९० चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र.४४३ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन १९८९-९० सालच्या वार्षिक अहवालाला हे प्राधिकरण मान्यता देत आहे. हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.६ : ओशिवरे जिल्हा केंद्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८९-९० या
कालावधीचा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्रमांक ४४४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण [१] ओशिवरा जिल्हा केंद्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या १९८९-९० च्या प्रारुप अहवालाला प्राधिकरण मान्यता देत आहे. आणि [२] हा अहवाल राज्य शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र.७ : वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन
प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा
१९८९-९० चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.४४५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, [१] महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ नुसार वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १९८९-९० या वर्षात केलेल्या कार्याचा प्रारुप अहवाल प्राधिकरण याद्वारे मान्य

करीत आहे, आणि [२] सदर अहवाल शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र. ८ : कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८९-९० चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४४६ :

"असा ठराव करण्यात येतो की, [१] महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३३ नुसार कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन १९८९-९० या वर्षात केलेल्या कार्याचा प्रारूप अहवाल प्राधिकरण याद्वारे मान्य करीत आहे आणि [२] सदर अहवाल शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहेत."

बाब क्र. ९ : बॅक-बे पुन:प्रापण योजनेकरिता [ब्लॉक तीन ते सहा] विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८९-९० चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४४७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, [१] बॅकबे पुनप्रापण योजनेतील ब्लॉक तीन ते सहाकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९८९-९० सालच्या प्रारूप वार्षिक अहवालास प्राधिकरण मान्यता देत आहे आणि [२] हा अहवाल राज्य शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

बाब क्र. १० : वसई-विरार अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८९-९० चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४४८ :

"असा ठराव करण्यात येतो की, [१] महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३३ अन्वये वसई-विरार अधिसूचित क्षेत्राचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन १९८९-९० च्या वार्षिक

अहवालाच्या मसुद्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे, आणि [२] हा अहवाल शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

बाब क्र. ११ : कल्याण विकास आराखडा
आरक्षण क्र. ७२ आणि ७४ मध्ये किरकोळ फेरफार

प्राधिकरणाने किरकोळ फेरबदलासंबंधीचा अधिकाऱ्याचा अहवाल मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४४९ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाने कल्याण मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र. ७२ आणि ७४ येथे किरकोळ फेरबदलासंबंधीच्या अधिकाऱ्याच्या अहवालास मंजूरी दिली आणि सदर अहवाल शासनास अंतीम मंजूरीसाठी सादर करण्याकरिता महानगर आयुक्तांना अधिकार दिले."

बाब क्र. १२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे
कलम १८[१][अ] खाली राज्य शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान

राज्य शासनाने मंजूर केलेल्या योजना कार्यान्वित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १८[१][अ] च्या तरतुदीनुसार प्राधिकरणाला दरवर्षी कमीत कमी ५ कोटी रुपये अनुदान शासनाला द्यावे लागते. वरील तरतुदीनुसार गेल्या १५ वर्षांच्या कालावधीत प्राधिकरणाला शासनाकडून ७५ कोटी रुपयांचे अनुदान मिळायला हवे होते. परंतू प्रत्यक्षात फक्त २३.०९८ कोटी रूपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. या अनुदानापैकी १०.६५ कोटी रूपये कळवा-तुर्भे रेल्वे सायडींगसाठी प्राधिकरणाने सहन करावयाचा ५०% खर्च म्हणून सिडकोला हस्तांतरीत केले आहेत. घोषित उद्दीष्टांवर खर्च करण्यासाठी प्राधिकरणाला प्राप्त झालेले गुणकारी अनुदान सुमारे १२.५ कोटीचे असून ते वर्षाला १ कोटीहूनही कमी पडते. यामुळे प्राधिकरणाला आर्थिक अपंगत्व आले असून उद्दीष्टे साध्य करण्यासाठी स्वत:चाच काही मार्ग चोखळावा लागणार आहे.

प्राधिकरणाच्या सदस्याना ही परिस्थिती सुखदायक न वाटल्यामुळे त्यानी इतर अतिरिक्त बांधिलकी बरोबरच राज्य शासनाला दरवर्षी कमीत कमी ५ कोटींचे सांविधिक अनुदान प्राधिकरणाला उपलब्ध करण्याची गळ घालण्याचा निर्णय घेतला

त्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला.

ठराव क्र. ४५० :

"असा ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाच्या दृष्टीने परिणामकारक भूमिका बजावणे शक्य होण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १८[१][अ] मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने प्राधिकरणाला दरवर्षी कमीत कमी ५ कोटी रुपयाच्या अनुदानाचे अंशदान करावे अशी प्राधिकरणाने राज्य शासनाला गळ घालावी.

"यापुढे असाही ठराव करण्यात येतो की उपरोक्त ठराव राज्य शासनाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. १३ : वडाळा येथील ट्रक टर्मिनल

नवीन पथक निर्माण करण्याबाबत.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४५१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ११ चे उपकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा व हयाबाबत त्याला सहाय्यभूत असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण या बाब टिप्पणीच्या परिच्छेद-४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे ट्रक टर्मिनल प्रकल्पाबाबतची कामे तातडीने करण्याकरिता एक पथक निर्माण करण्यास, राज्य शासन अशी पदे निर्माण करण्यास मान्यता देईल यास अधीन राहून याद्वारे आपली मंजूरी देत आहे."

अध्यक्षांच्या अनुमतीने पुढील बाब पटल बाब म्हणून विचारात घेण्यात आली.

पटल बाब : वडाळा ट्रक टर्मिनल क्षेत्रातील सायन कोळीवाडा जोडरस्त्याच्या क्षेत्रातील उजवीकडील मार्गात येणा-या झोपडपट्टयांचे पुन:स्थाननिश्चयन . ३.५८ हेक्टर जमिन पंतप्रधान अनुदान प्रकल्प/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचेकडे सुपूर्द करणे.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४५२ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाच्या दिनांक २९-११-९०च्या

ठराव क्र. ४३९ मध्ये अंशत: बदल करुन वडाळा अनिक क्षेत्रातील सुमारे ३.५८ हे. जमिन सायन कोळीवाडा जोडमार्गाच्या उजवीकडे येणा-या झोपड्यांच्या पुन:स्थान-निश्चयनासाठी प्रत्येक वर्षाला १ रु.च्या नाममात्र भाड्याने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण/पंतप्रधान अनुदान प्रकल्प याना परस्पर नेमून देण्याच्या विनंतीसह शासनाकडे संपर्क साधण्याचे अधिकार ह्या अन्वये महानगर आयुक्ताना देण्यात येत आहेत.

"असाही ठराव करण्यात येत आहे की सायन कोळीवाडा जोडमार्गाच्या उजवीकडील मार्गात येणारी व जिथे पुन:स्थाननिश्चयन करण्याची गरज आहे अशा प्रत्येक बांधकामामागे रु. १००००/- खर्च करण्याचे अधिकार ह्या अन्वये महानगर आयुक्ताना देण्यात येत आहेत."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

------

# MINUTES OF THE FIFTY-FOURTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 22nd February, 1991 (Friday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : 6th Floor, BMRDA Building, Bandra.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Sushilkumar S. Shinde, Minister for Urban Development | - Chairman |
| Prof. Javed Khan, Minister for Housing | - Member |
| Shri Arunlal G. Gujarathi, Minister of State for Urban Development | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, BMC. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, BMC. | - Member |
| Shri Balkumar Agarwal, Secretary to Government, Housing & Special Assistance Department | - Member |
| Shri R.L. Pardeep, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. | - Member-Secretary |

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (53rd) Meeting of the Authority.

The minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (53rd) Meeting of the Authority.

The action taken report was noted by the Authority.

Item No. 3 : Disposal of the residential portion of the plot in 'H' Block, Bandra-Kurla Complex, near Kamraj Nagar, Dharavi.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.441 :

"RESOLVED that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby accords approval for disposal of the plot admeasuring about 12427 Sq. Mtrs. with FSI 1.5 to MHADA for the purpose of Dharavi re-development under the

Prime Minister's Grant Project by leasing it to Prime Minister's Grant Project, MHADA, for a term of 30 years from the date of execution of the Agreement, at an annual lease rent of 8 per cent of the value of the land computed at the rate of Rs.3,000/- (Rupees Three thousand only) per FSI sq.mtr.

"RESOLVED FURTHER that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further suitable action for implementation of this Resolution and also to give Indemnity Bond to MHADA.

"RESOLVED FURTHER that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to effect suitable changes in the Agreement to Lease and Lease Deed while executing the documents in respect of the disposal of the said plot."

Item No. 4 : Transfer of the land admeasuring about 0.72 Ha. at Kokari Agar to Municipal Corporation of Greater Bombay, for constructing hospital.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.442 :

"RESOLVED that in exercise of the powers conferred on it in this behalf under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the proposal to lease land admeasuring about 0.72 Ha. or exact area that will be determined after measurement in Wadala-Anik to the Municipal Corporation of Greater Bombay for construction of hospital, as proposed.

"RESOLVED FURTHER that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further suitable action for transfer of this land to the MCGB and for indicating the rate of premium for grant of land.

"RESOLVED FURTHER that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make suitable changes in the Agreement to Lease and Lease Deed for transfer of the land to MCGB."

.....3/-

Item No. 5 : Annual Report of the BMRDA for 1989-90.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.443 :

"RESOLVED that the Authority do approve the Annual Report of the BMRDA for 1989-90 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No. 6 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre Area for the year 1989-90.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.444 :

"RESOLVED that the Authority hereby (i) approves the draft report of the BMRDA as the Special Planning Authority for Owhiware District Centre for the year 1989-90, and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No. 7 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1989-90.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.445 :

"RESOLVED that the Authority hereby (i) approves the draft of the Annual Report for the year 1989-90 of the BMRDA as Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area, as required under Section 133 of the MR&TP Act, 1966 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No. 8 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area for the year 1989-90.

The Authority approved the Annual Report and passed

the following Resolution :

RESOLUTION NO.446 :

"RESOLVED that the Authority hereby (i) approves the draft of the Annual Report for the year 1989-90 of the BMRDA as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as required under Section 133 of the MR&TP Act, 1966, and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No. 9 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Backbay Reclamation Scheme (Blocks III to VI) for the year 1989-90.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.447 :

"RESOLVED that the Authority hereby (i) approves the draft Report of the BMRDA as the Special Planning Authority for Blocks III to VI of Backbay Reclamation Scheme for the year 1989-90, and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.10 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Vasai-Virar Notified Area for the year 1989-90.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.448 :

"RESOLVED that the Authority hereby (i) approves the draft Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Vasai-Virar Notified Area for the year 1989-90 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

**Item No.11 : Development Plan Kalyan Minor modification to Site No.72 & 74**

The Authority approved the report of the officer on minor modification and passed the following Resolution :

**RESOLUTION NO.449 :**

"RESOLVED that the Authority hereby approves the report of the Officer on minor modification to the site Nos.72 & 74 to the sanctioned D.P. Kalyan and further authorises the Metropolitan Commissioner to forward the same to the Government for according final sanction."

**Item No.12 : Grant received from State Government under Section 18(1)(a) of BMRDA Act, 1974.**

The Authority noted that as per provisions of Section 18(1)(a) of the BMRDA Act, 1974 the State Government is required to give a grant of not less than Rs.5.00 crores per annum for the implementation of the schemes approved by the State Government. In terms of these provisions, the Authority ought to have received Rs.75.00 crores during the last 15 years as against which the Authority has actually received only Rs.23.098 crores, of which Rs.10.65 crores were passed on to CIDCO as grants towards Kalwa-Turbhe Railway Siding, being 50% share of the cost. The effective grant received by the Authority to be spent on the declared objectives was only around Rs.12.5 crores i.e. less than one crore a year. This has led to the financial crippling of the Authority and left it to find for themselves to achieve its objectives.

The Members were not happy on this and decided to urge upon the State Government to make available minimum statutory grant of Rs.5.00 crores per annum to BMRDA besides additional commitments. The following Resolution was then passed :

**RESOLUTION NO.450 :**

"RESOLVED that the Authority hereby urges upon the State Government to contribute a sum of not less than Rs.5.00 crores per annum as grant, as provided by Section 18(1)(a) of the BMRDA Act, 1974, with a view to enable BMRDA to play an effective role in development of B.M.R.

"RESOLVED FURTHER that the Metropolitan Commissioner be authorised to forward this Resolution to the State Government for necessary action."

Item No.13 : Truck Terminal at Wadala - Creation of new Unit.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.451 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby accords its sanction to create the Unit as detailed in para.4 of the Item Note to expedite the Truck Terminal Project, subject to the clearance of the State Government, as proposed."

The following Item was then considered as Table Item with the permission of the Chair.

Table Item : Relocation of hutments coming in the right-of-way of the Sion-Koliwada Connector Road (SKCR) in Wadala Truck Terminal area - handing over of land admeasuring 3.58 ha. to PMGP/MHADA.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.452 :

"RESOLVED that in partial modification of Authority's Resolution No.439, dated 29th November, 1990, the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to approach the Government with a request to directly allot the land admeasuring about 3.58 ha. in Wadala-Anik to the Maharashtra Housing & Area Development Authority/PMGP for relocation of hutments coming in the right-of-way of the Sion-Koliwada Connector Road on a nominal rent of Re.1/- per annum.

"RESOLVED FURTHER that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to incur an expenditure of Rs.10,000/- per structure which comes in the right-of-way of the Sion-Koliwada Connector Road which needs relocation."

The Meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

$$$$$$$$$$$$$$$$